# पंचायत समिती ,देवळा जि.नाशिक

## जाहिर ई निविदा सुचना क्रमांक १(प्रथम प्रसारण)

शिक्षण विभाग(प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत जिल्हा परिषद विद्यानिकेत देवळा वसतीगृहासाठी सन २०१७ - १८ वर्षाकरीता ११ महिन्यांसाठी वसतीगृहातील मुलांसाठी किराणा व धान्य पुरविणे या कामाकरीता दर करार करणेसाठी पात्र मक्तेदार /पुरवठादार यांचेकडुन ई निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे वर्णन | अंदाजित रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | वसतीगृहातील मुलांसाठी किराणा व धान्य पुरविणे | १९,००,०००/- | ३,०००/- | ५०,०००/- |

निविदेच्या अटी व शर्ती

१) गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा हे या निविदेसोबत जोडलेल्या दरपत्रका मध्ये आवश्यक असलेल्या जिल्हा परिषद विद्यानिकेतन देवळा, ता.देवळा येथे वसतीगृहासाठी सन २०१७-१८ वर्षासाठी किराणा व धान्य पुरविणे करणेसाठी २०१७-२०१८ करीता दर निश्चित करणेसाठी सामान्य पुरवठादार किंवा सहकारी संस्थाकडून ई-निविदा मागवित आहेत.सदर ई-निविदा http://mahatender.gov.in व www.zpnashik.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/१२/२०१७ रोजी पासून दि. ०६/ ०१ /२०१८ रोजी १७.०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. .मक्तेदारांनी त्यांनी भरलेल्या निविदांची प्रत शिक्षण विभाग,पंचायत समिती ,देवळा कार्यालयात दि. ०८/०१/२०१७ रोजी म्हणजेच वेवसाईट बंद झाल्याच्या दुस-या दिवशी दु.११.०० वाजेपर्यंत खालील अ.क्र.३) मध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात जिल्हा परिषद विद्यानिकेतन देवळा, ता.देवळा साठी किराणा व धान्य पुरविणे २०१७-२०१८ अंतर्गत किराणा व धान्य पुरविणे निविदा लिहून निविदाधारकाने त्यांचे पूर्णनाव , पत्ता फोन नंबरसह नमुद करून सादर करावीत .उशीराने आलेल्या निविदा स्वीकृत केल्या जाणार नाही .प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी किंवा मा.गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा यांना सोईस्कर अशा कामकाजाच्या कोणत्याही दिवशी बघण्यात येतील .

२) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता नाकारण्याचा हक्क **मा.गटविकास अधिकारी ,पंचायत समिती ,देवळा** यांनी राखून ठेवला आहे.

३) निविदे सोबत खालील कागद पत्रे असणे आवश्यक आहे.

### अ) तांत्रिक लिफापा

१) निविदा फी रक्कम रु.३,०००/- व बयाणा रक्कम रुपये-५०,०००/- ऑनलाईन नेट बँकींग पद्धतीने भरणा करणे आवश्यक राहील जर बयाणा रक्कम भरण्यापासून सूट असल्यास तसे दर्शविणारे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

२)निविदाधारक/पुरवठादार यांनी GST नोंदणी केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
(मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

३) शॉप ऍक्ट नोंदणी अद्यावत प्रमाणप्रत्र (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

४) वॅट / सेल्स टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

५) वॅट / सेल्स टॅक्स भरणा निपटारा प्रमाणपत्र अद्यावत (सन-२०१६-१७)

६) सहकारी संस्थेंच्या बाबतीत मागील तीन वर्षाचे शासनाकडून / प्राधिकृत संस्थेकडून केलेल्या लेखापरिक्षणाचे अहवाल.

७)अन्न व औषध प्रशासन कार्यालयाकडून अन्नभेसळ प्रतिबंधक कायदयाखालील प्रमाणपत्र
(मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

८) पुरवठा विभागाकडील अन्नधान्य साठा व विक्री परवाना (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

९) सहाकारी संस्थांनी निविदा भरणे बाबत त्यांचे पदाधिका-यांचा ठराव आणि ज्या व्यक्तीच्या नांवाने निविदा भरण्याचे अधिकार दिलेले आहेत. ते अधिकार पत्र निविदे सोबत जोडावे.

१०) आयकराचा PAN CARD No. नमूद करावा तसेच PAN CARD चा साक्षांकित प्रत जोडावी .

११) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र (रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर) (मुळ प्रत स्कॅन करुन जोडावी )

४) सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५)ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरा मध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल . जर अक्षरी व अंकी यामध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

६) सूरक्षा अनामत :- ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदाधारकांनी पूरवठा करवयाच्या एकूण किमतीच्या ५% एवढी सूरक्षा अनामत रक्कम भारतीय स्टेट बँक शाखा देवळा खाते क्र ३६८२६७६७२० देवळा IFSC-SBIN०००५१२६ BRANCH CODE ५१२६ येथे चलनाने भरणे आवश्यक आहे.सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिलेजाणार नाही.

७) यशस्वी निविदाधारकाने निविदा स्विकृतीच्या दिवसापासून आठ दिवसाच्या आत सूरक्षा अनामतरक्कमेचा भरणा केला नाही तर. त्यांची निविदा रद्द करण्यात येवून त्यांचे निविदे सोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल

८) निविदाधारकाने नमूद केलेले दर हे सर्वकरासहीत जकात,जीएसटी,वाहतूक खर्च , चढाई ,उतराई,पॅकीग व जि.प.वि.नि. देवळा पर्यंत पोहोच इत्यादी सह असावेत.

९) निविदाधारकाने निविदे सोबत अन्नधान्य किराण्याचे नमूने देणे आवश्यक राहील नमूनानसल्यासनिविदेचा विचार केला जाणार नाही.तसेच मंजूर झालेल्या निवेदाधारकाने दिलेल्या नमून्या प्रमाणे साहित्यांचा पूरवठा करावा लागेल.नमुन्या प्रमाणे साहित्य नसल्यास त्याचा स्विकार केला जाणार नाही.

१०) साहित्याचा पूरवठा कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते १८.०० या कालावधीत करावा लागेल.

११) विलंबाचा पूरवठा:- जर पुरवठाधारकांने मागणी केल्या पासून त्वरित एका दिवसात पुरवठा केला नाही तर सदर मागणी नोंदविलेल्या साहित्यांचा किमंतीच्या (अर्धा टक्का ) प्रतिदिन या दराने दंड करण्यास मा.गटविकास अधिकारी,(उ.श्रे) पंचायत समिती ,देवळा हे सक्षम आहेत.

१२) पुरवठा कालावधीत साहित्य पूरविण्यास जर पुरवठाधारक असमर्थ ठरल्यास किंवा पुरवठाधारकांने पूरवठा केलेल्या साहित्यामधील काही साहित्य अस्विकृत झालेले असल्यास असे अस्विकृत साहित्य मुदतीत बदलून दिले नाही तर मा.गटविकास अधिकारी(उ.श्रे),पंचायत समिती ,देवळा हे त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही पुरवठादाराकडून त्यांना योग्य वाटणा-या अशा दराने उर्वरीत साहित्य खरेदी करण्यास सक्षम राहतील.

अ)कसूरदार पुरवठाधारकांची पूरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही.

ब)कसूरदार पूरवठाधारकांस दोन्ही दरा मधील किमंतीतील फरक अथवा १० % टक्के रक्कम यापैकी जी जास्त रक्कम असेल तेवढया रक्कमेचा दंड करण्यात येईल.

क) जर कसुरदार पूरवठाधारकाने दंड रक्कमेचा भरणा केला नाही तर त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ठ केले जाईल. व या जिल्हा परिषदेच्या पुढील कोणत्याही खरेदीच्या वेळी त्यांचे निविदेचा विचार केला जाणार नाही.

१३) प्रदाने:- पुरवठा केलेल्या साहित्यांचे प्रदान साहित्यांचा पुरवठा संबधित अधिका-यांना पुरवठा केलेले साहित्य निविदे नुसार व चांगल्या प्रती मध्ये प्राप्त झाल्यावर केले जाईल. बिल अदा करण्यास विलंब झाल्यास रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.

१४) मंजुर पुरवठाधारक यांनी साहित्याचा पुरवठा स्वत:च करावयाचे आहे त्यांना उप पुरवठादार नेमता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१५) निविदा मंजुर झालेल्या कालावधीत किंवा पुढील ठेका मंजूर होई पर्यत उपरोक्त मंजुर दराने मालाचा पूरवठा व काम करणे बंधनकारक राहील.

१६) पुरवठा केलेल्या मालाच्या देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकराची रक्कम वसूल करण्यात येईल.

१७) निविदा स्विकृत झालेनंतर यशस्वी निविदाधारकास ५% अनामात रक्कम मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.)पं.स.देवळा यांचे खाती जमा करुन रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर जि.प.सोबत रितसर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. त्यात वरील अटी व शर्तीचा समावेश राहील. करारनामा करतेवेळी या अटी मध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार मा. गटविकास अधिकारी यांना राहील.

१८) या निविदेतीन अटी व शर्ती बाबत कोणत्याही प्रकारचा वाद उदभवल्यास मा.गटविकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती ,देवळा यांचा निर्णय अंतीम राहील.

१९) वरील निविदेतील सर्व वस्तुंचे दर भरण्याचे बंधनकारक आहे हे मला मान्य आहे.

२०) किराणा व धान्य पुरवठयाच्या अटी व शृती

१) प्राचार्य जि.प.वि.नि.देवळा यांनी दिलेल्या माहेवार किराणा मालाचे आदेशा नुसार निर्धारीत वेळेत माल पुरवठा करण्यात यावा.
२) किराणा माल व धान्य वसतिगृहापर्यत स्वतंत्र वाहनाने शालेय वेळेत पोहोचकरणे.
(सकाळी १०:०० ते १७:०० )
३) सपुर्ण तेल,किराणा माल व धान्य-डबा,बारदान विरहित कार्यस्थळी (जि.प.वि.नि.देवळा) येथे मोजून देणे बंधनकारक राहील.
४) किराणा माल स्वच्छ व उच्चप्रतिच्या दर्जाचाच असावा
५) गहू,बाजरी ,तांदूळ अळि,किड,जाळे काडी कचरा विरहित असावा.
६) काळा मसाला,मिरची पावडर,जिरे,मोहरी,हळद,हिंग,बडीशोप,खसखस,खोबरे,तूप इ.माल ॲगमार्क असलेल्या ब्रॅन्डेड १ किलो पॅकिंग मध्ये असावा
७) शेंगदाणे तेल ट्रीपल फिल्टर व १५ किलो चा डबा असावा.
८) शेंगदाणे,खोबरे,साखर कोरडे असावे
९) वनस्पती तूप ब्रन्डेड १ किलो किवा १५किलो पॅकिंग मध्ये असावे
१०)मालाची वाहतूक खर्च , चढाई ,उतराई हमाली स्वतंत्र्य अदा केले जाणार नाही .

२१) बाबनिहाय कमी दराच्या अनेक निविदा मंजुर न करता निविदेतील सर्व वस्तु व मालाची संपूर्ण गरज विचारात घेऊन ज्या निविदाधारकाचा संपुर्ण पुरवठयाचा खर्च कमी असेल अशा फक्त एकाच निविदाधारकाची निविदा मंजूर करण्याचा , मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती ,देवळा अधिकार असल्याचे मला मान्य आहे. तसेच मंजूर निविदा कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार मा.गटविकास अधिकारी, (उ.श्रे) पंचायत समिती ,देवळा यांनी राखुन ठेवला आहे हे मला मान्य आहे.

२२) वरील सर्व नियम अटी व शर्ती आंम्ही पूर्णत: वाचल्या असुन मान्य असल्याबाबतचे बंधपत्र स्वाक्षरी सह निविदे सोबत सादर करावे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| गट शिक्षण अधिकारी | गटविकास अधिकारी |
| पंचायत समिती देवळा | पंचायत समिती देवळा |

## किराणा व धान्य पुरवठया बाबत बंधपत्र(रु.१००/- चे स्टँम्पवर)

आम्ही गांभीर्य पुर्वक नमुद करतो की, आम्ही वर नमूद केलेल्या किराणा व धान्य पुरविणे या कामासाठीच्या निविदेतील सर्व अटी शर्ती वाचल्या असून या निविदे साठी आमचे दर निवेदेसोबतच्या प्रपत्रात नमूद केलेले आहेत.

आमची निविदा स्विकृत करण्यात आल्यास निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आम्ही बांधील राहू. आम्ही या अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यात दिलेल्या तपशिला नुसार आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

आमची निविदा स्विकृत झाल्यास आम्ही दिलेल दर हे पूढील आदेशा पर्यत आमचेवर बंधनकारक रहातील.

आम्ही निविदा प्रपत्रा मधील अटी शर्तीतील अट क्र.१ ते २२ नुसार पुरवठा करण्यास बांधील राहू.

दिनांक:- / /२०१७

निविदाधारकाची सही

नाव:

पत्ता

**ब) व्यापारी लिफाफा**

| अ. क्र. | तपशिल | मालाचे वर्णन | वर्षभरासाठी अपेक्षीत किराणा | परिमाण | पुरवठा करावयाचा दर प्रति किलो/ लि./नग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गहू | २१८९ | ११५ क्विंटल | प्रति किलो | | |
| २ | बाजरी | गावठी | १०० क्विंटल | प्रति किलो | | |
| ३ | तांदुळ | गरी कोळपी | ७०क्विंटल | प्रति किलो | | |
| ४ | मुगदाळ | उत्तम प्रतीची | ७क्विंटल | प्रति किलो | | |
| ५ | तुरदाळ | महाराजा | ३०क्विंटल | प्रति किलो | | |
| ६ | उडीददाळ | काळया सालीची | ५क्विंटल | प्रति किलो | | |
| ७ | चनादाळ | कोरडी व उत्तम | १३क्विंटल | प्रति किलो | | |
| ८ | मठदाळ | उत्तम प्रतीची | ५क्विंटल | प्रति किलो | | |
| ९ | हरभरा | गावठी | ५क्विंटल | प्रति किलो | | |
| १० | मठ चांगले | गावठी | ५क्विंटल | प्रति किलो | | |
| ११ | साबुदाणा | डबल हत्ती | १क्विंटल | प्रति किलो | | |
| १२ | पोहे | कच्चे | ४क्विंटल | प्रति किलो | | |
| १३ | शेंगदाणे | कोरडा | ८क्विंटल | प्रति किलो | | |
| १४ | पांढरे तीळ | पॉलीश | १५किलो | प्रति किलो | | |
| १५ | साखर | सी ग्रेड | १३क्विंटल | प्रति किलो | | |
| १६ | गुळ | चिक्कीचा | १० किलो | प्रति किलो | | |
| १७ | वांशिग पावडर | निरमा | ३०० किलो | प्रति किलो | | |
| १८ | रवा | सम्राट जाड | ४क्विंटल | प्रति किलो | | |
| १९ | जाडमीठ | आयोडीन युक्त | १०क्विंटल | प्रति किलो | | |
| २० | चवळी | सफेद गावठी | ७क्विंटल | प्रति किलो | | |
| २१ | बारीकमीठ | टाटाचे | १५० किलो | प्रति किलो | | |
| २२ | खाण्याचा सोडा | पॅकिंग | ८किलो | प्रति किलो | | |
| २३ | काळा मसाला | ऍगमार्क | ३५०किलो | प्रति किलो | | |
| २४ | मैदा | सम्राट | २००किलो | प्रति किलो | | |
| २५ | मोहरी | ऍगमार्क | ५०किलो | प्रति किलो | | |
| २६ | जिरे | ऍगमार्क | ५०किलो | प्रति किलो | | |
| २७ | हळद दळलेली | ऍगमार्क | ५०किलो | प्रति किलो | | |
| २८ | खडाहिंग | ऍगमार्क | ५०किलो | प्रति किलो | | |
| २९ | बडी शोप | ऍगमार्क | ५०किलो | प्रति किलो | | |
| ३० | खसखस | ऍगमार्क | २५किलो | प्रति किलो | | |
| ३१ | दाळ्या | - | २५किलो | प्रति किलो | | |
| ३२ | खोबरे | राजापूरी | ६०किलो | प्रति किलो | | |
| ३३ | लालमिरची पावडर | ऍगमार्क | ३५०किलो | प्रति किलो | | |
| ३४ | धने | - | २५किलो | प्रति किलो | | |
| ३५ | खोबरे तेल | ऍगमार्क | १४०किलो | प्रति किलो | | |
| ३६ | कपडाचा साबण २५० ग्रॅम | रिन | २४००नग | प्रति नग | | |
| ३७ | टुथपेस्ट २०० ग्रॅम | मॅक्स कोलगेट | ५००नग | प्रति नग | | |
| ३८ | वनस्पती तूप | ऍगमार्क | ३००किलो | प्रति किलो | | |
| ३९ | शेंगदाणे तेल | ट्रीपल फिल्टर | १५००किलो | प्रति किलो | | |
| ४० | फिनेल | टगियर | २०० लिटर | प्रति लिटर | | |
| ४१ | अंगाचा साबन २०० ग्रॅम | डेटॉल | २४०० नग | प्रति नग | | |
| ४२ | बिस्कीट ७९ ग्रॅम | पारले जी | २४०० नग | प्रति नग | | |
| ४३ | झाडू (कुचा) | उत्तम प्रतिचा जाड | ५०० नग | प्रति नग | | |
| ४४ | खराटे | उत्तम प्रतिचा जाड | ५०० नग | प्रति नग | | |
| ४५ | हॅंड वॉश | डेटॉल | २४०० नग | प्रति नग | | |
| | | | | **एकुण** | | |